# प्रशासन

ग्रामीण भागातील विविध कामांची व विकास योजनांची अंमलबजावणी व लोकशाही संस्थांच्या विकासाला उत्तेजन देण्याचे दृष्टीने जिल्हा षरिदेची निर्मिती झाली. महाराष्ट्र जिल्हा परिषदांची निर्मिती 1 मे 1962 रोजी करण्यात आली. स्थानिक व सरकारी कामकाजात जनतेचा सहभाग होण्याचे दृष्टीने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे कामे, अधिकार व कार्य यांचे विक्रेंदीकरण करण्यात आले आहे. 73 व्या घटनादूरुस्तीने पंचायत राज संस्थाचे विक्रेंदीकरण करण्यात आले असून जिल्हा परिषदांना अधिक व्यापक अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

अमरावती जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा परिषद गणातून निवडून आलेले 59 सभासद व 14 पंचायत समिती सभापती असे मिळून एकूण 73 सभासद आहेत. जिल्हा परिषदेचे कामकाजासाठी सर्वोच्च सर्वसाधारण सभा आहे. सदर सभेचे अध्यक्ष हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष तर पदसिध्द सदस्य सचिव म्हणून उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन हे कामकाज पाहतात. यामध्ये सर्व जिल्हा परिषद सदस्य तसेच पंचायत समिती सभापती सहभाग घेतात. सदर समितीची बैठक तिन महिन्यातून एकदा घेणे बंधनकारक आहे. तसेच खास कारणास्तव विशेष सभा घेण्याची तरतूद आहे.

जिल्हा परिषदेचा प्रशासन प्रमुख म्हणून अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्याची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती शासनातर्फे करण्यात येत असते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कामकाजात मदत करण्यासाठी एक अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तसेच तिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी मदत करतात. तालुकास्तरावर गट विकास अधिकारी हे पंचायत समितीचे प्रशासन प्रमुख असून त्यांना मदत करण्यासाठी सहायक गट विकास अधिकारी पदाचे निर्माण करण्यात आलेले आहे.